# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./८५७२/२०१९ दि.२४/१२/२०१९

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक व सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या जाहिराती मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत देण्यात येतात. परंतु सदरच्या जाहिराती या उर्दु भाषेत देण्यात येत नाही. त्यामुळे राज्य शासनाच्या योजनांची माहिती उर्दु भाषिक युवकांना, महिलांना समजुन येत नसल्यामुळे शिक्षण व रोजगार या बाबतीत सहभाग नोंदविता येत नाही. याबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ०६ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये शासनाच्या सर्व विभागांना त्यांच्या योजनाची माहिती होण्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रासोबतच ज्या जिल्हयामध्ये उर्दु भाषिकांची संख्या जास्त आहेत, तेथील उर्दु भाषिक वर्तमान पत्रांमध्ये राज्य शासनाच्या जाहिराती प्राध्यान्याने देण्यात याव्यात, असे निर्देश दिलेले आहे. करीता सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. मा. विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ...........
जावक क्र. 12678 दि. 10/12/19

**महाराष्ट्र शासन**
शिक्षण संचालनालय **(उच्चशिक्षण)**
महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पहिला मजला,पुणे-४११००१.

www.dhepune.gov.in **Email.vishi.dhepune@nic.in**

क्र-उशिसं/संकीर्ण/उर्दु.भाषा/जाहीरात/विशि.१/२०१९ 115590 दि.०२.०१२.२०१९
2 DEC 2019

प्रति,
**मा. कुलसचिव,**
सर्व अकृषि विद्यापीठे.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 4685 दि. 10/12/19
जावक क्र. ............ दि. ............

**विषय- सर्व विद्यापीठांना त्यांच्या कार्यक्षेत्रात जाहीरात देताना उर्दु भाषेतही जाहीरात देणेबाबत.**
**संदर्भ-** १.मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.प.क्र.जाही/का.५/२०१९-२०/२३५०/ दिनांक-०५ जुलै,२०१९
२.शासन पत्र क्र. संकीर्ण-दिनांक-१८ आक्टोंबर,२०१९
३. ॲड.सलिम शेख, पुणे यांनी मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना लिहीलेले दि.२१.८.२०१९ चे पत्र

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, सर्व अकृषि विद्यापीठांकडून त्यांच्या कार्यक्षेत्रात विविध प्रकारच्या जाहीराती मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत देण्यात येतात. परंतु सदरच्या जाहीराती या उर्दु भाषिक वृत्तपत्रामध्ये देण्यात येत नाहीत.त्यामुळे राज्य शासनाच्या योजनांची माहिती उर्दु भाषिक युवकांना, महिलांना समजून येत नाही , तसेच शिक्षण व रोजगार या बाबतीत आपला सहभाग नोंदविता येत नाही.

या बाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्या दि.०६ जुलै,२०१९ च्या पत्रान्वये शासनाच्या सर्व विभागांना त्यांच्या योजनांची माहिती होण्यासाठी मराठी, हिंदी, इंगजी भाषेतील वृत्तपत्रांसोबतच ज्या जिल्हयामध्ये उर्दु भाषिकांची संख्या जास्त आहे. तेथील उर्दु भाषिक वर्तमान पत्रांमध्ये राज्यशासनाच्या जाहीराती ( शिक्षण, रोजगार, शिष्यवृत्ती, महिला विकास इ) प्राध्यान्याने देण्यात याव्यात, असे निर्देश दिले आहेत.

तरी सर्व विद्यापीठांनी त्यांच्या शिक्षण, रोजगार, शिष्यवृत्ती, महिला विकास याबाबतच्या जाहीराती मराठी, हिंदी, इंग्रजी भाषिक वृत्तपत्रांसोबतच उर्दु भाषिकांची संख्या जास्त असलेल्या भागामध्ये उर्दु भाषेमध्ये देण्यात याव्यात..

( डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक **(उच्चशिक्षण)**
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

मा.१.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. ॲड.सलिम शेख, पुण.१ यांना माहितीस्तव

Atul